PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sulavarchi poli
Year: 1980

Song: Mich mala ainyat pahile
Lyricist: Rajesh, Anant Jadhav

मीच मला आयन्यात पाहिले
बाई गं
मीच मला आयन्यात पाहिले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
कळलं वयात मी आले
आई गं काळजात चर्र माझ्या झाले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले

खिडकीमधूनी हळूच खुणविती
खिडकीमधूनी
खिडकीमधूनी हळूच खुणविती
अवती भवती कुणी घुटमळती
अवती भवती कुणी घुटमळती
समद्यांनी हैराण केले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले

काय करू हा पदर घसरतो
जो तो मजला निरखून बघतो
आ हा आ हा
काय करू हा पदर घसरतो
जो तो मजला निरखून बघतो
पायात पाय माझ्या आले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले

बावरले मी काही सुचेना
बावरले मी
बावरले मी काही सुचेना
या देहाला काही रूचेना
या देहाला काही रूचेना
गाली उगाच मी हसले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
मीच मला आयन्यात पाहिले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले
अन् बाई मी लाजून लाल लाल झाले

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*